## परिशिष्ट-१

# महाराष्ट्र विधानपरिषद निवडणूक, नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ मतदार यादी तयार करणे

## मतदार नोंदणी नियम १९६० नियम ३१(३) अन्वये नोटीस / सूचना

१. मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१(३) अन्वये नागपूर शिक्षक मतदार संघातील पात्र व्यक्तींना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या खाली दिलेल्या प्रपत्र १ मध्ये नमूद केलेल्या मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे दिनांक ५ नोव्हेंबर २०१६ (शनिवार) पूर्वी त्याचे / तिचे नाव नोंदणी करण्याकरीता मतदार नोंदणी नियम १९६० अन्वये खाली नमूद केलेल्या प्रपत्र २ मधील नमुना १९ मध्ये अर्ज भरुन पाठवू अथवा दाखल करु शकतील.

२. वर नमूद केल्याशिवाय सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी व खाली दिलेल्या प्रपत्र- १ मधील पदनिर्देशित अधिकाऱ्याकडेही अर्ज सादर करु शकतील.

*शिक्षक मतदार संघाची मतदार यादी प्रत्येक निवडणुकी पुर्वी प्रत्येक वेळी नव्याने तयार करणे आवश्यक आहे, ज्यांची नांवे विद्यमान यादीत समाविष्ट केलेली आहेत. अशा सर्व व्यक्तींना नव्याने मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे.*

३. पात्रता : भारतीय नागरिकत्व असलेली प्रत्येक व्यक्ती ज्याचा नागपूर विभाग शिक्षक मतदार संघात सर्वसाधारण रहिवास आहे आणि १ नोव्हेंबर २०१६ पूर्वीच्या लगतच्या ६ वर्षापैकी एकूण ३ वर्षे माध्यमिक स्तर किंवा त्यावरील शिक्षण संस्थेत शिकविण्यासाठी कार्यरत असल्यास मतदार यादीत नाव नोंदविण्यास पात्र असेल. अशा अधिसूचित शिक्षण संस्थेची यादी प्रपत्र- १ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्याकडे उपलब्ध असेल.

४. शिक्षक मतदार संघामध्ये नांव नोंदणी करण्यासाठी इच्छुक प्रत्येक शिक्षकाने अर्ज दाखल करतांना नमुना 19 सोबत लगतच्या ६ वर्षामध्ये एकूण ३ वर्ष शिक्षक म्हणून कार्यरत असल्याबाबतचे शिक्षण संस्था प्रमुखाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संलग्न करणे आवश्यक आहे. प्रमाणपत्राचा विहित नमुना खालीलप्रमाणे आहे.

---

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री/श्रीमती/कुमारी.................................................... . . . .

हे.................................... .या शिक्षण संस्थेत यापूर्वी लगतच्या ६ वर्षापैकी एकूण ३ वर्ष मंजुर पदावर नियमित/तदर्थ (ad-hoc) पदावर शिक्षण देत आहेत.

2. (अ) ** संस्थेच्या दस्ताऐवजानुसार त्याची तिची त्या संस्थेमध्ये . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पासून. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पर्यंत कार्यरत आहे.

किंवा

(ब) **संस्थेच्या दस्ताऐवजानुसार तो/ती त्या संस्थेमध्ये सेवा खालील कालावधीसाठी कार्यरत होते.

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पासून. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पर्यंत

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पासून. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .पर्यंत

. . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . (सही, नांव व संस्थेचा शिक्का)

(** लागु नसेल ते खोडावे)

---

6. अशी व्यक्ती जी अर्ज करण्याच्या तारखेस शिक्षण संस्थेत कार्यरत नसेल तर ती व्यक्ती शेवटी ज्या शिक्षण संस्थेत

कार्यरत होते त्या संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

एखाद्या व्यक्तीद्वारे अथवा टपालाने पाठविलेले गठठा (in bulk) अर्ज मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून ग्राहय मानले जाणार नाहीत. तथापि, संस्थाप्रमुख आपल्या संस्थेतील शिक्षकांचे एकत्रीत अर्ज पाठवू शकतात. कुटुंबातील एक व्यक्ती कुटुंबातील इतर सदस्यांचे नमुना १९ मधील अर्ज सादर करु शकतात व इतर सदस्यांचे मूळ दस्तऐवज तपासणीसाठी दाखल करु शकतात.

8. कोणतीही व्यक्ती खोटी माहिती देईल अथवा खोटी असल्याचे ज्ञात असूनही खरी म्हणून दाखल करेल तसेच खरी माहिती नसूनही खरी असल्याचे म्हणून दाखल करेल अशी व्यक्ती भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम ३१ नुसार शिक्षेस पात्र असेल.

9. नमुना १९ मधील छापील अर्ज मतदार नोंदणी अधिकारी सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा पदनिर्देशित अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतील किंवा नमुना १९ मधील नमुन्यात हस्तलिखित, टंकलिखित, सायक्लोस्टाईल अथवा खाजगी छपाई केलेल्या नमुन्यातील अर्ज स्विकारले जातील.

परिशिष्ट-ब-१

**भारत निवडणूक आयोग**

नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ महाराष्ट्र विधान परिषद करिता पूर्णत: नव्याने मतदार यादी तयार करण्यांचा कार्यक्रम मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे नियम ३१(४) अन्वये सुचना

मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे नियम ३१(३) अन्वये मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ३०.०९.२०१६ च्या सुचनापत्राद्वारे वर नमूद मतदार संघात मतदार म्हणून नोंदणी करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींनी ते दिनांक ५ नोव्हेंबर, २०१६ रोजी अथवा त्यापूर्वी नमूना १९ मध्ये अर्ज भरून त्यांच्या कार्यालयात पाठवू अथवा दाखल करू शकतात.

नमूना १९ मधील अर्जांचा नमूना, दि. ३०.०९.२०१६ च्या दैनिक १) महारष्ट्र टाईम्स २) लोकमत टाईम्स च्या वृत्तपत्रात मतदार नोंदणी नियम १९६० मधील तरतुदीनुसार परिशिष्ट प्रपत्र-२ म्हणून प्रसिध्द केले.

वर नमूद सर्व पात्र व्यक्ती नमूना-१९ मधील अर्ज यापूर्वी सादर केले नसल्यास ५ नोव्हेंबर, २०१६ रोजी अथवा त्यापूर्वी सादर करू शकता.

या विषयाचा तपशील मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांचे कार्यालयीन संकेतस्थळ http://ceo.mahatashtra.gov.in वर सुध्दा उपलब्ध आहे.

अनूप कुमार

(अनूप कुमार)
मतदान नोंदणी अधिकारी
नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघ
तथा विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

D/Bhave/Teacher Constituency/